Vol. 5 | Special Issue -2 | October 2019 Impact Factor: 4.197 ISSN: 2454-5503

(4) Dr. Shivaji Diwan
(Pol. sci.)

# CHRONICLE OF HUMANITIES AND CULTURAL STUDIES

A Peer Reviewed Bimonthly International Journal

Special Issue on the Occasion of
UGC Sponsored Interdisciplinary National Conference on


# Gandhian Thought:
## Past, Present and Future

1 October, 2019

Organized by
Shri. Yogeshwari Education Society's

## Swami Ramanand Teerth Mahavidylaya

Ambajogai, Dist. Beed - 431517



*Chief Organizer*
**Mr. Ramesh Sonwalkar**
*I/C Principal, S.R.T.M. Ambajogai*

*Chief Editor*
**Dr. Shailaja Barure**
*Director, Gandhian Studies Center,*

*Associate Editor*
**Mr. Dhanaji Arya**

IMPACT FACTOR:4.197(IIJIF) ISSN: 2454-5503

# CHRONICLE
## OF HUMANITIES AND CULTURAL STUDIES (CHCS)

VOL. 5 SPECIAL ISSUE OCTOBER 2019

A Peer Reviewed Bimonthly International Journal

Special Issue On the Occasion of UGC Sponsored
Interdisciplinary National Conference on

**Gandhian Thought: Past, Present and Future**

*Organized by*
Shri Yogeshwari Education Society, Ambajogai
**Swami Ramanand Teerth Mahavidyalaya**
UGC Sponsored Gandhian Studies Center,
Deparments of English and Social Sciences

**Date: 1st October, 2019**

*Chief Organizer*
**Mr. Ramesh Sonwalkar**
*I/C Principal, S.R.T.M. Ambajogai*

*Chief Editor*
**Dr. Shaailaja Barure**
*Director, Gandhian Studies Center, Ambajogai*

*Associate Editor*
**Mr. Dhanaji Arya**
*Director, IQAC*

*Mahatma Gandhi Education and Welfare Society's*
**CENTRE FOR HUMANITIES AND CULTURAL STUDIES, KALYAN (W)**
www.mgsociety.in +91 8329000732 Email: chcskalyan@gmail.com

२४. महात्मा गांधी व डॉ.बाबासाहेब आंबेडकर / बोरकर सुरेंद्र ज.| ११६
२५. महात्मा गांधीजींचे स्त्री विषयक उदात व मानतावादी विचार / डॉ. वळवी यशवंत आर. | १२०
२६. महात्मा गांधीचींचे शैक्षणिक विचार / व्ही बी माने | १२४
२७. वर्धा शिक्षा योजना सिध्दांत जो बताता है कि ज्ञान और कार्य अलग नही है / शेख ईशरत शेख ईकबाल | १२७
२८. महात्मा गांधीजींचे समग्र विचार / प्रितम मच्छिंद्र गलांडे | १३३
२९. नारी उत्थान में महात्मा गांधीजी का योगदान / डॉ.नाईक एन.डी. | १३७
३०. महात्मा गांधीयांचे विचार / चाटे नारायण, गायकवाड राहुल | १४१
३१. महात्मा गांधी यांचे राष्ट्र उभारणीतील आर्थिक विचार / डॉ. पलमंटे माधव पां. | १४४
३२. गांधीजी : काल आज आणि उद्या / डॉ. प्रशांत भा. सोळंके | १४८
३३. महात्मा गांधींचे शैक्षणिक विचार /डॉ.शिवाजी गो. दिवाण | १५१
३४. महात्मा गांधी यांचे शिक्षणविषयक विचार /डॉ.ओमशिवा लिगाडे| १५६
३५. गांधीजी का समकालीन महत्व / डॉ.रमेश वि. मोरे | १६०
३६. महात्मा गांधीजी आणि नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे स्वातंत्र्य अंदोलनातील योगदान / प्रा.डॉ. जि.व्ही.गट्टी | १६५
३७. महात्मा गांधीजीच्या आर्थिक विचारांची प्रासंगिकता / अमोल अ. पगार | १६८
३८. महात्मा गांधी आणि महिला सक्षमीकरणाचे आणि त्यासंबंधी सद्यस्थितीचा अभ्यास विकासात्मक कार्य / डॉ.पांढरे विद्युलता ज्ञा. | १७१
३९. ग्रामीण विकासासंदर्भात महात्मा गांधीजींचे विचार / पवार राधिका विजयकुमार | १७५
४०. महात्मा गांधी यांचे राष्ट्रीय एकात्मतेसंबंधी विचार / चौधरी प्रदीप वि. | १८०
४१. महात्मा गांधीच्या विचारांची प्रासंगिकता / प्रकाश रे. वाणी | १८४
४२. महात्मा गांधी आणि ग्राम स्वराज्य / डॉ. भारत.भो.राठोड | १८८
४३. महात्मा गांधी आणि ग्रामस्वराज्य / श्रद्धा मो.पवार | १९१
४४. महात्मा गांधीजींचे शैक्षणिक विचार / सुलभा ब. सोळंके | १९६



Sawant K.D.
Lecturer in History
Mahila College, Georai

33.

# महात्मा गांधींचे शैक्षणिक विचार

**प्रा.डॉ.शिवाजी गोविंदराव दिवाण**
राज्यशास्त्र विभाग
महिला कला महाविद्यालय, गेवराई ता.गेवराई जि.बीड

महात्मा गांधी ही एक व्यक्ती नसून ते एक 'स्वतंत्र युग' होते. भारतात आणि जगात लोकम.गांधीजींच्या तत्त्वज्ञानाने भारावून गेलेले आपणास दिसून येतात. त्यामुळे त्यांच्याकाळाकडे आजही 'गांधीयुग' म्हणून पाहिले जाते.

गांधीजींना 'राष्ट्रपिता अर्थात Father of the nation' म्हणतात. खरेतर असा उल्लेख सर्वप्रथम केला तो नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी ! भारतीय स्वातंत्र्य चळवळीत महात्मा गांधींचे अत्यंत महत्त्वाचे योगदान आहे. साधारणतः १९२० ते १९४८ यादरम्यान गांधीजींच्या विचारांचा प्रभाव भारतीयावर दिसून येतो.

**गांधीजींबद्दलचे मत :-**

१. अलबर्ट आइनस्टाईन- "हाडा मासाचा हा महामानव अस्तित्वात होता यावर पुढील पिढ्यांचा विश्वास बसणार नाही.

२. विनोबा भावे- "भगवान बुध्दानंतर सत्य अहिंसेचा एवढा पूजारी झाला आहे."

३. गोपाळकृष्ण गोखले- "गांधीजींसारख्या पवित्र, शुध्दहृदय साहसी उच्चात्मा व्यक्तीने या पृथ्वीवर यापूर्वी कधी जन्म घेतला नाही असे ते व्यक्ती होते."

४. लियॉन ब्लम- "मी गांधीजींना कधी पाहिले नाही त्यांची भाषा मला अवगत नाही, त्यांच्या देशात मी कधी पाय देखील ठेवला नाही, तरी पण त्यांच्या मृत्युने अगदी जवळच्या दोस्ताचा मृत्यू झाल्यासारखे मला दुःख होत आहे.

महात्मा गांधी केवळ राजकारणीच नव्हते तर स्वातंत्र्ययोध्दे, समाजसुधारक, शिक्षणतज्ज्ञ, राजकीय विचारवंत, अस्पृश्योधारक धर्मवक्ते, अर्थतज्ज्ञ होते.

गांधीजींना 'महात्मा' ही उपाधी सर्वप्रथम रविंद्रनाथ टागोर यांनी दिली. महात्मा गांधी हे भारताच्या स्वातंत्र्य संग्रामातील प्रमूख नेते आणि महान तत्वज्ञ होते. गांधीजींच्या नैतिक आणि राजकीय विचारांवर जॉन रस्कीन, डेव्हिड थ्युरो आणि टॉलस्टॉय याचा प्रभाव दिसतो.

गांधीजींची भाषा सरळ व सोपी होती. त्यांच्या सरळ व सोप्या भाषेचा प्रभाव लाखो लोकांवर पडलेला दिसून येतो. महात्मा गांधी यांनी गोपाळकृष्ण गोखले यांना आपले राजकीय गुरु मानले. गांधीजी गीतेला आपला मार्गदर्शक मानत असत.

गांधीजींचे आई-वडील धार्मिक प्रवृत्तिचे होते. त्यांचा धार्मिक प्रभाव त्यांच्यावर पडलेला दिसून येतो. जगातील महत्त्वपूर्ण विद्यापीठात महात्मा गांधी यांचे तत्वज्ञान शिकवले जाते. त्यामुळे महात्मा गांधी यांचा विचार जगातील लोकापर्यंत गेले.

जगातील प्रत्येक देशाचा विकास हा त्या देशाला दिल्या जाणाऱ्या शिक्षणावर अवलंबून असतो याची जाणीव महात्मा गांधी यांना होती.

**महात्मा गांधींचे शिक्षण विषयक विचार :-**

**शिक्षणाचा अर्थ :-**

प्रत्येक व्यक्तीला सुसंस्कृत चारित्र्य संपन्न बनविण्याचा अत्यंत सोपा मार्ग म्हणजे शिक्षण होय. शिक्षण म्हणजे मनुष्याचा सर्वांगीण विकास होय. शिक्षण हे सामाजिक उन्नतीचे साधन आहे. अहिंसात्मक तत्वाला शिक्षणात विशेष स्थान दिले पाहिजे असे गांधीजींचे मत होते. शिक्षणातून व्यक्तीला जीवन जगण्याची कला प्राप्त होते. महात्मा गांधी शिक्षणाला 'सुंदर झाड' असे म्हणत. त्यांनी शिक्षणाला राष्ट्राच्या विकासाचा आत्मा मानले. गांधीजींना वर्गातील बंदिस्त व पाठयपुस्तकात एकवटलेले शिक्षण नको होते.

**शिक्षणाची प्रमुख उद्दिष्ट्ये :-**

१. स्वावलंबन व स्वयंपूर्णता वाढविणे.
२. चारित्र्य संवर्धन करणे, नैतीक शिक्षणाद्वारे व्यक्तिमत्व सुसंस्कृत करणे.
३. समता, सहिष्णूता, सहकार्य या गुणांची वाढ करणे.
४. संस्कृती संवर्धन करणे.
५. व्यक्तीला तिच्या हक्काची अधिकारांची जाणीव करुन देणे.
६. व्यक्तीला सुशिक्षित करुन तिच्या चरितार्थासाठी उद्योगधंदे निर्माण करणे.
७. राजकीय सामाजिक व आर्थिक क्षेत्रात समानता निर्माण करणे.

**अभ्यासक्रम व माध्यम :-**

गांधींनी शिक्षकाच्या दर्जाबरोबर अभ्यासक्रम व माध्यम या गोष्टींना महत्त्वाचे स्थान दिले. विद्यार्थ्यांना परकीय भाषांची सक्ती करता कामा नये असे त्यांचे मत होते. उदा. विद्यार्थ्यांना इंग्रजी भाषेची सक्ती करु नये परंतु इंग्रजी भाषेच्या अभ्यासाने बाहेरील जगाचे संस्कृतीचे ज्ञान होते म्हणून ती भाषा ऐच्छिक असावी. अभ्यासक्रम अशा रितीने पूर्ण असावा. मुलांना साहित्य, समाजसेवा, विज्ञान, गणित नीतीतत्वे यांचे ज्ञान होऊन त्यांचा सर्वांगीण विकास व्हावा.

**शिक्षकाबाबत अपेक्षा :-**

गांधीजींनी शिक्षण देणाऱ्या शिक्षकाबाबत काही अपेक्षा गृहीत धरल्या आहेत. त्याच्या मते सत्य, असहिष्णूता, प्रेम व सहानुभूती निर्माण करण्याचे कार्य शिक्षण

करीत असते. म्हणून शिक्षक आदर्श, ज्ञानी, उत्साही असला पाहिजे. शिक्षकाने स्वयंसेवक वृत्तीने आपले कार्य केले पाहिजे. भाडोत्री वृत्तीने केवळ पोटासाठी त्याने हे कार्य करु नये. विवेक, बुध्दी, चारित्र्य नैतीकता- बंधुत्व यांचा सुरेख संगम शिक्षकामध्ये असला पाहिजे. गांधींच्या मते शिक्षक हा चारित्र्य संपन्न, श्रध्दावान, साधक असला पाहिजे.

**रचनात्मक, विधायक कार्यक्रमात शिक्षणाला महत्वाचे स्थान :-**

त्यांच्या मते शिक्षणाद्वारे देशातील सर्वसामान्य अशिक्षित माणसाला स्वातंत्र्य, समता बंधूत्व या गोष्टी खऱ्या अर्थाने समजतील. आर्थीक शोषण पारतंत्र्य, गुलामगिरी, दारिद्र्य इ. चे ज्ञान लोकांना करुन द्यायचे झाले तर शिक्षणाशिवाय दुसरे माध्यम नाही. सुखी स्वयंपूर्ण समाज निर्माण करावयाचा असेल तर प्रथम व्यक्ति ज्ञानी, कुशल बनविणे आवश्यक ठरते. म्हणून गांधीजींनी आपल्या रचनात्मक विधायक कार्यक्रमात शिक्षणाला महत्वाचे स्थान दिलेले आहे.

**विश्वविद्यालयीन शिक्षणाचे महत्व :-**

गांधीजींनी विश्वविद्यातील शिक्षणाचे महत्व विशद करताना म्हटले की, "आपल्या देशाच्या स्वातंत्र्यासाठी जे आपले जीवन समर्पित करतील, असे सच्चे जनसेवक निर्माण करणे हे विश्वविद्यालयीन शिक्षणाचे ध्येय असले पाहिजे, महाविद्यालयातून शिकून बाहेर पडलेले युवक प्रामाणिकपणे जनतेच्या संरक्षणाची जबाबदारी आपल्या शिरावर घेतील तरच मी त्यांना हिम्मत बहाद्दर समजेन."

**हिंदीचा राष्ट्रभाषा म्हणून प्रसार :-**

गांधीजींना 'हिंदी' या भाषेचा राष्ट्रभाषा म्हणून प्रसार केला. हिंदी भाषा, साधी, सोपी, सरळ आहे. तिच्या माध्यमाद्वारे राजकीय, धार्मिक, आर्थिक व्यवहार करणे सहज सुलभ आहे ती सर्वांना समजेल अशी भाषा आहे. म्हणूनच भारतातील सर्व राज्यांना हिंदी या भाषेचा राष्ट्रभाषा म्हणून स्वीकार करावा.

राष्ट्रीय ऐक्य वाढविण्यासाठी, जोपासण्यासाठी हिंदी राष्ट्रभाषा आवश्यक आहे. असे त्यांनी आवर्जून सांगितले.

**प्रौढ शिक्षण, स्त्री शिक्षण :-**

गांधीजींनी अज्ञानी, अडाणी लोकांना सुशिक्षित करण्यासाठी प्रौढ शिक्षण व स्त्री शिक्षण यांना चालना दिली.

लोक शिक्षणाद्वारे बुध्दी व श्रम यांचा समन्वय साधला जाऊन ग्रामीण भागातील लोकांचा विकास साधता येईल. याची गांधीजींना खात्री होती. स्त्रियांची बौध्दीक, नैतीक शक्ति पुरुषांच्या बरोबरीने आहे तेव्हा त्यांना शिक्षण देऊन चूल आणि मूल या कोंडवाड्यातून मुक्त करावे असे गांधीजींचे मत होते.

कुटूंबातील एक स्त्री शिकली तर सर्व कुटूंब शिकल्यासारखे होईल. म्हणून त्यांनी स्त्री शिक्षणाला आपल्या विधायक कार्यक्रमात अग्रगण्य स्थान दिले आहे.

**जनतेला सुजाण, सुशिक्षित व सुसंस्कृत करण्याचे ध्येय :-**

गांधीजींनी धार्मिक शिक्षण, लैंगिक शिक्षण, संगीत शिक्षण व शारीरिक शिक्षण या बाबत ही आपले विचार मांडून त्याची आवश्यकता प्रतिपादन केली. त्यांनी केवळ शैक्षणिक तत्त्वज्ञान मांडले नाही तर शैक्षणिक तत्त्वज्ञानाची वास्तववादाशी सांगड घातली आहे. त्यासाठी त्यांनी विविध ठिकाणी आश्रम शाळा सुरु केल्या होत्या. आफ्रिकेत फिनिक्स वसाहत १९९४, स्टॉल स्टॉय फार्म १९११, सेवाग्राम स्थानात कोचरब येथील सत्याग्रहाश्रम १९१५, साबरमती आश्रम १९१८ सेवाग्राम, १९३६ वर्धा योजना इ. आश्रम निर्माण करुन त्यांनी शिक्षणाचा महान प्रयोग केला.

**नई तालीम योजना :-**

शिक्षणाचे विविध नवीन प्रकार पाडून समाजातील सर्व लोकांना कशा पध्दतीने शिक्षण प्राप्त होईल याकडे विशेष लक्ष दिलेले आहे. बाल शिक्षणाबाबतची 'नई तालीम' ही योजना अत्यंत नावाजलेली गोष्ट होती. सात ते चौदा वर्षे वयोगटातील मुलांना विनामूल्य व सक्तीने शिक्षण दिले जावे हे प्राथमिक शिक्षण स्वयंपूर्ण व पायाभूत शिक्षण पध्दतीची योजना मांडली.

**हरिजन शिक्षण कार्यक्रम :-**

गांधीजींना अस्पृश्यता निवारणाचा महान प्रयोग सुरु केला होता आणि त्यातील महत्त्वाचा एक कार्य भाग म्हणून त्यांनी हरिजन शिक्षणाला प्रोत्साहन दिले होते. शिक्षणात जात, धर्म, वंश असा भेद न करता सर्वांना समान संधी मिळाली पाहिजे. मागास वर्गीयांना विशेष शैक्षणिक सवलती देऊन त्यांना सुशिक्षित केले पाहिजे असे सांगून त्यांनी प्रत्यक्ष हरिजन शिक्षण कार्यक्रम सुरु केला होता.

**मातृभाषेतून शिक्षण :-**

शिक्षण हे मातृभाषेतून दिले गेले पाहिजे असे गांधीजींना वाटत होते. मातृभाषा ही प्रत्येक व्यक्तीला आवडत असते. मातृभाषा ही दररोजच्या बोलण्याची भाषा असते. मातृभाषेतून शिक्षण दिल्यामुळे शिक्षण घेणाऱ्याला गोडी निर्माण होते. मातृभाषा ही सहज सोपी वाटते. दुसऱ्या भाषेतून शिक्षण दिले तर ते कठीण व कंटाळवाणे वाटू लागते. शिक्षण प्रक्रिया व्यवस्थित चालण्यासाठी सर्वांना समजेल अशा त्यांच्या मातृभाषेतून शिक्षण देणे महत्वाचे आहे.

**बुध्दी, मन आणि हात :-**

महात्मा गांधींचा शिक्षण विचार मन, मस्तिष्क आणि कर म्हणजेच 'मन, मेंदू आणि हात यांना जोडणारा होता. माणसाच्या बुध्दीमत्तेचा संपूर्ण विकास व्हावा.

त्यांच्या हाती निर्माणाचे सामर्थ्य यावे, श्रम प्रतिष्ठा प्राप्त व्हावी, त्याचे अंतः करण स्वच्छ व्हावे, त्यांच्या हृदयातून येणारा हुंकार आणि आतला आवाज हा त्याला स्वाभिमान आणि अस्मिता प्रदान करणारा असावा असे गांधीजींना वाटत होते. गांधीजींच्या मते हाताने श्रमदान केले पाहिजे. गांधीजींना स्वावलंबी शिक्षण ओजस्वी शिक्षण अभिप्रेत होते." महात्मा गांधीच्या शिक्षणामुळे व्यक्ती आणि सभोवतालचा निसर्ग, शिक्षण संस्था आणि समाज शिक्षण आणि राष्ट्र जीवन यांना एकत्र जोडणे शक्य होणारे आहे.

**संदर्भ ग्रंथ :**


१. डॉ.अरविंद श्रंगारपूरे, समग्र भारतीय व पाश्चात्य राजकीय विचारवंत, विद्या प्रकाशन, नागपूर.
२. डॉ.अरविंद दुनाखे, शैक्षणिक तत्त्वज्ञान.
३. भारतीय राजकीय विचारवंत, डॉ.साहेबराव गाठाळ
४. डॉ.धनंजय आचार्य, गांधीयुग (२००९) साईनाथ प्रकाशन नागपूर
५. डॉ. पंजाब चव्हाण, मूल्यव्यवस्था : गांधी विचार निर्मल प्रकाशन, नांदेड
६. शहा जी.बी., आधुनिक भारताचा इतिहास (१९५६ ते १९५०) प्रशांत पब्लिकेशन्स जळगाव
७. नाटके अरविंद, महात्मा गांधी सरिता प्रकाशन, पुणे
८. बाळासाहेब भारदे (संपा.) गांधी विचार दर्शन, शिक्षण विचार, महाराष्ट्र गांधी स्मारक निधी गांधीभवन कोथरुड, पुणे-१९९४
९. डॉ.वा.भा.पाटील, आधुनिक भारतीय राजकीय विचारवंत भाग-२.


❑❑❑

Sawant K.D.
Lecturer in History
Mahila College, Georai.